**SET-4**

**Series &RQPS**

प्रश्न-पत्र कोड
**Q.P. Code 9**

रोल नं.
**Roll No.** | | | | | | | | |

परीक्षार्थी प्रश्न-पत्र कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें।
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

**नोट**

(I) प्रश्न-पत्रिकेत **11** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.

(II) प्रश्न-पत्रिकेत **9** प्रश्न आहेत; तपासून घ्या.

(III) प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला प्रश्न-पत्रिकेत कोड उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.

(IV) **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**

(V) प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.

**NOTE**

(I) Please check that this question paper contains **11** printed pages.

(II) Please check that this question paper contains **9** questions.

(III) Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.

(IV) **Please write down the serial number of the question in the answer-book before attempting it.**

(V) 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : **3** तास* | *गुण : **80***

*निर्धारित समय : **3** घंटे* | *अधिकतम अंक : **80***

*Time allowed : **3** hours* | *Maximum Marks : **80***

*General Instructions :*

*(i) Question paper is divided into **Four** questions.*

*(ii) It has total 09 questions.*

*(iii) Section A : 02 Questions No. 1 & 2*

*(iv) Section B : 02 Questions No. 3, 4 & 5*

*(v) Section C : 01 Questions No. 6*

*(vi) Section D : 03 Questions No. 7, 8 & 9*

*(vii) Attempt questions as per specific instructions.*

*(viii) Write questions no. in answer book before attempting it.*

***सर्वसाधारण सूचना :***

*(i) या प्रश्नपत्रिकेत – **अ, ब, क, ड** – असे **चार** विभाग आहेत.*

*(ii) सर्व विभाग आवश्यक आहेत.*

*(iii) **यथाशक्य** सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.*

*(iv) एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमाने च यावीत.*

**विभाग – 'अ' – वाचन व आकलन** **15**

1. पुढील परिच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

एका बाजूला लाल मातीचा खंडोबाचा माळ. माळाच्या विरुद्ध बाजूला आठ महिने वाहणारी सीता नदी. या दोहींच्या मधे वसलेलं आमचं गाव. आमचं म्हणावं तर स्वतःची जमीन नाही आणि स्वतःचं घर नाही. वडील शिक्षक. नोकरीच्या निमित्ताने इथे येणं झालं. माझा जन्म याच गावात झाला. 'गुरुजींचा पोरगा' ही पदवी कायम चिकटलेली. जगण्याची प्राथमिक ओळख याच गावात झाली. म्हणून हे आमचं गाव.

दर गणपतीच्या वेळी आम्ही खंडोबाच्या माळावर जायचो. पोळ्याचे बैल शेतातल्या काळ्या मातीचे आणि गणपतीसाठी मात्र माळावरची लाल माती. या लाल मातीबरोबरच माळावर मोठमोठे दगड होते. त्या दगडांखाली तरातरा पळणारे नांगीबाज विंचू असायचे. हे विंचू बघण्यात अद्भुत मजा होती. पळसाच्या पानाल लाल मातीचा गोळा घेतला की खाली उतरायची गडबड सुरू होई. पण माळाच्या खाली उतरण्याआधी मी पुन्हा पुन्हा खाली पसरलेल्या गावाकडे बघून घेई. नील आर्मस्ट्रॉंगला चंद्रावरून पृथ्वीकडे पाहताना जेवढा आनंद झाला असेल तेवढाच आनंद मला माळावरून गावाकडे पाहताना व्हायचा. गावातली घरं खूप छोटी छोटी दिसायची. मंदिरांचे कळस आणि मशिदीचे मिनार मात्र ठळक ओळखू यायचे. गावाबाहेरची शाळाही ओळखू यायची. सीता नदीचा चमकणारा वळणदार पांढरा पट्टा तर चित्रातल्यासारखाच दिसायचा. छोट्या छोट्या घरात मी माझं घर शोधण्याचा प्रयत्न करायचो. गल्लीतल्या विठ्ठल मंदिराचा कळस लक्षात यायचा. घरांच्या गर्दीत लपलेलं माझं घर माळावरून कधीच दिसलं नाही. पण मनात बसलेलं घर मात्र आजही डोळ्यांसमोर तेवढंच आंतर्बाह्य लख्ख आहे.

मुळात छोट्या गावात त्या वेळी भाड्याने घर देण्यासाठी वेगळी सोय नव्हती. ज्यांच्याकडे मोठे मोठे वाडे असायचे ते लोक मोठ्या वाड्यातली रिकामी जागा नोकरदारांना भाड्याने देत. त्यातल्या त्यात शिक्षकाला तर अग्रक्रमाने जागा मिळायची. अशाच एका वाड्यात वैद्य गुरुजींना म्हणजे आम्हाला घर मिळालं. पुढे कित्येक वर्षं ते घर आमचंच झालं. याच घरांच्या स्मृती माझ्यात कायम आहेत.

हे घर म्हणजे मोठ्या वाड्याचा मागचा भाग होता. उघडखांबी लांब ओसरी आणि त्यावर उघडखांबी लांब माडी. ओसरीत दोन अंधाऱ्या खोल्या. प्रशस्त अंगण. अंगणात झाडं-वेली. घरमालकाकडे काहीतरी बांधकाम होतं म्हणून कधीतरी वाळू-सिमेंट कालवण्यासाठी आमच्या ओसरीत अर्ध्या भागात फरशी अंथरलेली होती. ती फरशी तशीच राहून गेली. बाकी सर्वत्र सारवायची जमीन होती. भिंतीही मातीने सारवल्या जायच्या. रुंद भिंतीतच दोन छोटी कपाटं होती. बाकी व्यवस्था अशी काहीच नव्हती. पाहुणे आले तर ओसरीतच बसायचे. ओसरीतल्या कोपऱ्यात चुलीवर अन्न शिजायचं. कुठं भिंत नाही की पडदा नाही. ओसरीतच पंगत बसायची. भरपेट खाऊन झाल्यावर अंगणातल्या झाडाशी जाऊन हात धुवायचे. सगळं सांडपाणी पिऊन चमकोरा (अळू) चांगलाच वाढलेला असे. घरात भाजीला काही शिल्लक नसलं की आई आवाज द्यायची. 'जारे, भाजीला चमकोऱ्याच्यां काड्या काढून आण बरं !' चमकोरा तोडण्यातही कौशल्य होतं. नाही तर अंग खाजायचं. प्रत्येक पाहुणा ओसरीतल्या पंगतीत जेवला पाहिजे असा वडिलांचा शिरस्ता होता.

(a) खालील प्रश्नांची योग्य उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा. **3 × 1 = 3**

(I) माळावरून लेखकाला कधीच न दिसलेली गोष्ट कोणती ?

(अ) खंडोबाचा माळ (ब) स्वतःचे घर

(क) शाळा (ड) सीता नदीचा पट्टा

(II) लेखकाच्या मते कोणत्या गोष्टीत कौशल्य असणे गरजेचे आहे ?

(अ) वाळू-सिमेंट कालवणे (ब) अन्न शिजवणे

(क) शाळा (ड) चमकोरा तोडणे

(III) पुढीलपैकी कोणत्या गोष्टीचा प्राथमिक परिचय लेखकाला गावात झाला ?

(अ) ओसरीचा (ब) मोठ्या वाड्याचा

(क) चमकोऱ्याचा (ड) जगण्याचा

(b) पुढील प्रश्नांची **15/20** शब्दांत उत्तरे लिहा. **2 × 2 = 4**

(I) लेखकाने माळाचे वर्णन कसे केले आहे ?

(II) लेखकाच्या कुटुंबाला भाड्याचे घर कुठे व कसे मिळाले ?

(c) पुढील प्रश्नाचे उत्तर सुमारे **40/50** शब्दांत लिहा. **1 × 3 = 3**

लेखकाने वाड्यातील घराचे वर्णन कसे केले आहे ?

2. खालील कविता वाचून ह्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

बनू आत्मनिर्भर, बनू स्वावलंबी,
तमातून जाऊ प्रकाशी, प्रकाशी !!
महामंत्र आम्हां 'स्वदेशी, स्वदेशी' ।। धृ ।।

वस्त्रे स्वदेशी, अस्त्रे स्वदेशी
कष्टांतुनी निर्मु सारे स्वदेशी
पूजा श्रमाची करु नित्य आम्ही
नवा मंत्र घुमवुं, 'स्वदेशी-स्वदेशी' ।।१।।

रक्षू हिमाद्री नि सागर किनारे
सदा दक्ष राहूंच सीमांवरी
आकाश, भूमीही रक्षू आम्ही अन्
नवे विश्व निर्मू 'स्वदेशी-स्वदेशी' ।।२।।

आम्ही एक सारे, आम्ही बंधु सारे
आम्हीच आमचे नि उद्‌धारकर्ते
समृद्धिचे स्वप्न साकार कराया
आम्हा घोष एकच 'स्वदेशी-स्वदेशी' ।।३।।

(a) खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांमधून निवडून लिहा. **2 × 1 = 2**

(I) आमचा महामंत्र कोणता आहे ?

(अ) आत्मनिर्भरता (ब) स्वावलंबन

(क) स्वदेशी (ड) प्रकाशी

(II) आमचे उद्धारकर्ते कोण आहेत ?

(अ) आमचे बंधु (ब) आम्हीच

(क) समृद्धी (ड) आमची स्वप्ने

(b) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. **3 × 1 = 3**

(I) आम्ही कोणाचे रक्षण करणार आहोत ?

(II) आम्ही कशाचे नित्य पूजन करणार आहोत ?

(III) आम्ही कोणते स्वप्न साकार करणार आहोत ?

## विभाग – 'ब' – लेखन **20**

3. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयवार **300** ते **325** शब्दांचा निबंध लिहा. **1 × 10 = 10**

(आवश्यकता वाट्ल्यास दिलेल्या मुदृयांचा आधार ध्यावा.)

I. झाडे लावा – चैतन्य फुलवा - पर्यावरण असमतोल - जंगलतोड - वने ही राष्ट्रीय संपत्ती - भारतीय संस्कृतीत वृक्षपूजा - वृक्षसंवर्धनाचे उपक्रम - पर्यावरण समतोल.

II. मी शाळा बोलते आहे – शोळेचे विद्यार्थ्यांशीनाते - ज्ञानदान, संस्कार-भावी पिढीचे भवितव्य - शिक्षणाबद्दल अनादराची खंत

III. आजची स्त्री आणि स्वातंत्र्य – आजची स्त्री प्रगत - सर्व क्षेत्रात स्थान - प्रगती - पुरुषप्रधान समाज व्यवस्था - परिणाम - उपभोग्य वस्तू - नैसर्गीक मर्यादा - असुरक्षित - उपाय

IV. पावसाळ्यातील एक दिवस – पावसाळा ऋतुचे महत्त्व – पावसाळ्यातील सहल - सहलीचे ठिकाण - निसर्ग वर्णन - मनावर झालेला परिणाम

4. खालीलपैकी **कोणत्याही एका विषयावर** पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) **1 × 5 = 5**

तुम्ही सायली/समर्थ नेवासकर, संगमनेर जि. अ'नगर येथून आपल्या विद्यालयाच्या ग्रंथलयासाठी मागविलेली पुस्तके न मिळाल्याची तक्रार करणारे पत्र रसिक साहित्य, पुणे यांना लिहा.

**किंवा**

निखिल/ज्ञानदा तांबे, हिरेवाडी, नासिक येथून आपल्या घराच्या परिसरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याविषयीचे पत्र महापालिकेच्या आरोग्य विभागास लिहा.

5. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर अंदाजे **60/70** शब्दांत लिहा. **1 × 5 = 5**

रेल्वे स्टेशनवरील हमालाची मुलाखत घेण्यासाठी एक प्रश्नावली तयार करा.

**किंवा**

शालेमध्ये झालेल्या आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धेचा अहवाल लिहा.

**विभाग – 'क' – व्याकरण** **15**

6. सूचनांप्रमाणे उत्तरे लिहा.

(a) वाक्यातील अधोरेखित शब्दाचा समास ओळखा. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

I. त्यांनी यथोचित स्वागत केले.

(अ) इतरेतर द्वंद्व (ब) अव्ययीभाव

(क) कर्मधारय समास (ड) विभक्ती तत्पुरूष समास

II. 'वृक्षवेली' या सामासिक शब्दाचा समास आहे .....

(अ) कर्मधारय समास (ब) द्वंद्व समास

(क) विभक्ती तत्पुरुष समास (ड) अव्ययीभाव समास

III. यां पैकी कोणते पद तत्पुरूष समास आहे ?

(अ) परमेश्वर (ब) पाचसहा

(क) शब्दकोश (ड) सुगंध

IV. यैपैकी कोणते पद द्वंद्व समास आहे ?

(अ) चंद्रमुख (ब) देवपूजा

(क) राजाराणी (ड) महाभारत

(b) पुढील वाक्यांचा सूचनेनुसार प्रयोग ओळखा किवां बदला. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

I. कर्तरी प्रयोगचि वाक्य कोणते ते लिहा.

(अ) दंतवैधाने दात दाखवला. (ब) दुसऱ्या दिवशी मी सुटीवर गेले.

(क) तिने पिवशी कपाटात ठेवली. (ड) सईने तुम्हाला धन्यवाद दिले

II. स्वतःचे अनुभव स्वतःच जमा करावयाचे आहेत .... या वाक्याचा प्रयोग आहे.

(अ) कर्तरी प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग

(क) भावे प्रयोग (ड) अकर्मक भावे प्रयोग

III. तो गावी जातो. (भावे प्रयोग करा)

IV. माणूस पैश्याला महत्त्व देतो. (कर्मणी प्रयोग करा)

(c) वाक्य प्रकार ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्यप्रकार बदला. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

पुढील वाक्याचा प्रकार ओळखा.

I. काय हा उन्हाळा !

II. मी कोणाचेही मन दुखवत नाही.

III. तुम्ही हे कार्य चालू ठेवा. – याचे नकारार्थी वाक्य –

(अ) का बंद करता तुम्ही हे कार्य ? (ब) तुम्ही हे कार्य बंद करू नका.

(क) तुमचे हे कार्य अजुनही चालू आहे ! (ड) हे कार्य चालू ठेतून काय होणार ?

IV. मी तुला कधी त्रास देईन का ? – या वाक्याचे विधानार्थी वाक्य असेल –

(अ) मी कधीतरी तुला त्रास दिला आहे का ?

(ब) किती त्रास दिला आहे मी तुला !

(क) मी तुला कधीही त्रास देणार नाही.

(ड) मी तुला नेहेमीच त्रास देत आहे.

(d) पुढे काही वाक्ये दिली आहेत. त्या वाक्यांत कंसात दिलेल्या वाक्प्रचारां पैकी योग्य त्या वाक्प्रचारा चा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही **तीन**) **3 × 2 = 6**

(वास्तपुस्त करणे, दाती तृण धरणे, निगडित असणे, सामसूम होणे, डोळा न लागणे)

(अ) गावात नवनि आलेल्या माणसाची गावकऱ्यांनी <u>कसून चौकशी केली.</u>

(ब) सैनिकांच्या अफाट पराक्रमामुळे शत्रुला <u>शरण यावेच लागेल.</u>

(क) रात्री झलेल्या चोरीशी <u>संबंधित</u> तपास पोलीस करत होते.

(ड) उद्याच्या परिक्षेप्या निकालाबद्दल विचार करताना शीतलला <u>रात्रभर झोप आली नाही.</u>

**विभाग – 'ड' – गद्य–पद्य पाठ आणि उपयोजित लेखन** **30**

7. गद्य–पाठांधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(a) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. **3 × 1 = 3**

I. लेखकाला असे वाटले नव्हते की, दात उपटण्याची क्रिया इतकी .... असेल.

(अ) अवघड (ब) सोपी

(क) स्वस्त (ड) किचकट

II. पहाटेच्या किरणांनी बागेतील मोगरा.....

(अ) फुललेला असतो. (ब) न्हाऊन निघालेला असतो.

(क) सुगंधित झालेला असतो. (ड) टवटवीत झालेला असतो.

III. सैनिकांनी सर्वांचे ..... स्वागत केले.

(अ) कॉफी देऊन (ब) सलामी देऊन

(क) गरम पाणी देऊन (ड) फुले देऊन

(b) पुढीलपैकी कोणत्याही **दोन प्रश्नांची** प्रत्येकी सुमारे **35/40** शब्दांत उत्तरे लिहा. **2 × 2 = 4**

I. शिवराज गोर्ले यांनी वाचनाच्या छंदाबद्दल कोणते विचार व्यक्त केले आहेत ?

II. लेखिकेने सैनिकांना भेटण्यासाठी कोणता दिवस निवडला ? का ?

III. लेखकाला निसर्ग आणिआपली नात यांच्यामध्ये कोणते साम्य वाटते ?

IV. दात दुखतो तेव्हा लेखकाला कोणता साक्षात्कार होतो ?

(c) पुढील पैकी कोणत्याही **दोन प्रश्नांची उत्तरे** सुमारे **70/75** शब्दांत लिहा. **2 × 4 = 8**

I. लेखिकेने विजयस्तंभासमोर कोणती शपथ घेतली ?

II. 'एकटं असण्यातही' एक वेगलाच आनंद असतो, असे शिवराज गोर्ले का म्हणतात ?

III. आपल्या बागेतील मोगऱ्याच्या झाडाबाबत कोणता अनुभव लेखकाने सांगितला आहे ?

8. (a) पद्य पाठांच्या आधारे योग्य पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही **दोन**) **2 × 1 = 2**

I. बा.भ. बोरकरांनां शेते ...... वाटतात.

(अ) वेळूची बेचे (ब) कोमल पाचूची

(क) पिकांनी भरलेली (ड) फुलांनी बहरलेली

II. ह्या विंचवाला उतारा आहे ......

(अ) तमोगुण (ब) अंगारा

(क) कामक्रोध (ड) सत्त्वगुण

III. 'रंग माझा वेगळा' ही कविता ..... आहे.

(अ) निसर्ग कविता (ब) गझल

(क) मुक्तछंद (ड) भारूड

(b) कोणत्याही **दोन प्रश्नांची** सुमारे **35/40** शब्दांत उत्तर लिहा. **2 × 2 = 4**

I. दुःखाला माझा लळा लागला, असे कवी सुरेश भट का म्हणतात ?

II. कवीला आषाढ घनाच्या पाऊलखुणा कोठे कोठे दिसतात ?

III. कामक्रोधरूपी विंचू चावल्यामुळे माणसाची अवस्था कशी होते ?

(c) पुढीलपैकी **एका** काव्यपंक्तीचा भावार्थ सुमारे **70/75** शब्दांत उत्तर लिहा. **1 × 4 = 4**

फुलं सोन्याची, झेंडु तोडते

बाई तोडते

नाही फुलं ग, देह तोडते

बाई तोडते

**किंवा**

रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून

शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय

9. (a) पुढीलपैकी कोणत्याही प्रश्नाचे प्रत्येकी एकावाक्यात उत्तर लिहा. **1 × 2 = 2**

I. भावाच्या सत्काराचा कार्यक्रम कोठे होणार होता ?

II. गुरुजींचे संपत्याशी काय नाते होते ?

(b) पुढील प्रश्नाचे **60/65** शब्दांत उत्तर लिहा. **1 × 3 = 3**

मुलाखत घेण्यासाठी कोणकोणती पूर्वतयारी करावी लागते ?

**किंवा**

माहितीपत्रक म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप थोडक्यात सांगा.

---